| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण यांचे कार्यालय<br>जिल्हाधिकारी कार्यालय कंपाउन्ड,सोलापुर -४१३००३<br>दुरध्वनी :- ०२१७-२७३२०१०<br>फॅक्स:- ०२१७-२७३२००८<br>ई-मेल:- sp.solapur.r@mahapolice.gov.in | |
| जा.क्र.पशा-२/मंडप साहित्य दर करार/२०२६/ 356/415 | | सोलापुर ग्रामीण- १३/०१/२०२६ |

**विषय-:** पाणी जार पुरवठा करणेच्या निविदा (दरपत्रके) सादर करणेबाबत..

# जाहिरात

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आदेशीत करण्यात येते की, सोलापूर ग्रामीण घटकातील आस्थापनेवरील श्री.क्षेत्र विठ्ठल-रुक्मीणी मंदीर पंढरपूर तेथे आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघवारी एकादशी करिता मोठया प्रमाणात बंदोबस्त असतो त्याअनुंषगाने येणा-या सदर वारीच्या अनुषंगाने सदर वारीच्या अनुषंगाने बंदोबस्ताकरिता येणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच होमगार्ड यांना पोलीस संकुल,तसेच धर्मशाळा, मठ,शासकिय शाळा,कॉलेजस या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्यात येत असते. त्या ठिकाणी त्यांना स्वच्छ पिण्याची पाण्याचे जार खरेदी करणे आवश्यक असल्याने ते आवश्यकतेनुसार खालील प्रमाणे सामुग्रीची वार्षिक दर करार करणेकरिता स्थानिक बाजारातील दरपत्रके सादर करणेकरिता महाराष्ट्र शासन निर्णय उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निणर्य भाखसं/२०१४/प्र.क्र-८२/भाग-३/उदयोग-४,दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मधील ४.४.३ मधील नियामानुसार खाजगी /अधिकृत विक्रेते यांचेकडून दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने इच्छुक व्यावसायिक यांनी खालील अटी व शर्तीचे अधीन राहून सिलबंद दरपत्रके सादर करावीत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | प्रति नग/प्रति स्क्वेअर फुट/प्रति रनिंग फुट | प्रति दिन व प्रति दर रूपये |
|---|---|---|---|
| १. | पाणी जार | | |

**निविदासाठीचा तपशिल अटी, शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

**निविदा सूचना**

१. निविदेमध्ये नमुद करण्यात आलेले साहित्या मध्ये पुरवठा करते वेळी बदल झाल्याचे निदर्शनास आल्यास होणा-या बिलांमधून दंड वसुल केला जाईल.

२. सदर वारीच्या अनुषंगाने बंदोबस्ताकरिता येणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच होमगार्ड यांना पोलीस संकुल,तसेच धर्मशाळा, मठ,शासकिय शाळा,कॉलेजस या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्यात येत असते. त्या ठिकाणी त्यांना स्वच्छ पिण्याची पाण्याचे जार खरेदी करणे आवश्यक असल्याचे ठिकाणी जाण्याचा ,येण्याचा व इतर कुठल्याही प्रकारचा खर्चाची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३. निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

४. पुरवठा करावयाच्या साहित्यावरील सर्व प्रकारचे विक्रिकर, प्राप्तीकर व इतर सामान्य कर या सर्व बाबी विचारात घेवून सर्व करासह साहित्याचे दर अक्षरी व अंकात नमुद करावेत.

५. ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत करण्यात आलेली आहे त्यांनी त्याच दिवशी रु.१००/- च्या स्टँप पेपरवर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचे बरोबर करार करावा.

६. निविदा धारकाच्या मंजूर बिलातून नियमानुसार आयकर/GST वजावट केली जाईल.

७. ना मंजूर निविदा बाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. या निविदा पत्रकातील बाबी संबंधी काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ झाल्यास अथवा न्यायालयात जावे लागल्यास त्याचे न्यायक्षेत्र मर्यादा सोलापूर क्षेत्रापुरती मर्यादीत राहील.

९. निविदे मध्ये नमुद साहित्य संख्या त्या वस्तूसाठी सादर केलेले दर यावरुन खरेदीची होणारी एकूण रक्कम ज्या निविदाधारकांची सर्वात कमी असेल अशा निविदाकाराची निविदा स्विकारण्यात येईल.

१०. निविदेचा लिफाफा यातील निविदेच्या शर्ती व अटीतील कोणतीही अट शिथिल करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडे असेल.

११. निविदेतील अटी व शर्ती मान्य असले बाबत रु.१००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करुन देणे निविदा धारकांना बंधनकारक राहिल.

१२. कोणतेही कारण न दर्शविता निविदा स्विकारण्याचा /नाकारण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.

१३. Specification नुसार माल स्विकारण्यात येईल.

१४. पाणी जार किंमतीमध्ये वाढ अथवा घट झाल्यास निविदेतील दराप्रमाणेचे साहित्य घेण्यात येईल.

१५. निविदा ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येईल .

१६. या लिफाफयामध्ये निविदाधारकाने स्वत: सही करुन स्व-साक्षांकित केलेले सर्वसमाविष्ट दर दर्शविणारी विहीत निविदा प्रपत्र (प्राईस टेंडर फॉर्म ) ही सादर करताना कोणतीही अट घातलेली नसावी. अट घालून दिलेल्या निविदाबाबत विचार केला जाणार नाही व तसे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही.

१७. श्री.क्षेत्र विठठल-रुक्मीणी मंदीर पंढरपूर तेथे आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघवारी एकादशी करिता मोठया प्रमाणात बंदोबस्त असतो त्याअनुंषगाने साहित्य लावण्याकरीता हजर राहवे लागते त्यामुळे कोणतीही प्रकारची सुटटी घेता येणार नाही.

१८. सदर साहित्य कामाचे बिल हे पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण यांना अनुदान उपलब्ध झाल्यास अदा केले जाईल.

१९. एखादया महिन्यात अनुदान उपलब्ध झाल्यास सदर बिलावरती कोणतेही व्याज मागता येणार नाही.

२०. परस्पर पूर्व परवानगीशिवाय साहित्य लावण्यात आल्यास त्याबाबतच्या देयकास हे कार्यालय जबाबतदार राहणार नाही.

२१. देयक कामाची पुर्तता होताच तात्काळ संबधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने तीन प्रतीत या कार्यालयास सादर करतील.

२२. सदरचा वार्षिक दर करार हा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाकरीता असणार आहे.

२३. विहित मुदतीत /वेळेत काम न केल्यास व तक्रार प्राप्त झाल्यास अथवा असमाधानकार काम केल्यास आवश्यक ती कारवाई करण्याचे हक्क पोलीस अधीक्षक,सोलापूर ग्रामीण यांचेकडे राहतील.

२४. पाणी जार वाटपासाठी अधिक माहितीसाठी पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर यांना सपंर्क करून निविदा सादर करण्यात यावे.

सोलापूर ग्रामीण घटकातील आस्थापनेवरील श्री.क्षेत्र विठठल-रुक्मीणी मंदीर पंढरपूर तेथे आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघवारी एकादशी करिता मोठया प्रमाणात बंदोबस्त असतो त्याअनुंषगाने लागणारे पाणी जार पुरवठा किती खर्च येतो याबाबतचा दर करार करणेकरिता स्थानिक बाजारातील दरपत्रके सादर करणेकरिता खालील अटी व शर्तीच्या

आधारे या कार्यालयाच्या www.solapurpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेनंतर **दिनांक२१२ /०१/२०२६ रोजी ठिक .६.०० सायंकाळी वाजेपर्यत** तसेच जाहिरात प्रसिध्द केलेनंतर कामाचे ५ दिवसामध्ये आवक शाखा येथे दरपत्रके सादर कराव्यात विहित मुदती नंतर प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

**पोलीस अधीक्षक,**
**यांचे मान्यतेने.**

**( शिरीष हुंबे )**
**पोलीस उपअधिक्षक (मुख्या),**
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण.**
**यांचेकरिता.**

**प्रति, पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण.**
२/- सदर पाणी जार पुरवठा करणेबाबचे दरपत्रके मागविणे बाबतची जाहिरात या सोबतच्या विवरण पत्रासोबत कार्यालयाच्या **www.solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**प्रत- आवक शाखा,सोलापूर ग्रामीण**
**२/-** वरील पाणी जार पुरवठा करणेबाबतचे सीलबंद निविदा प्राप्त झालेनंतर या कार्यासनाकडे तात्काळ सादर करण्यात याव्यात.